# सांगलीचा इतिहास

१०२४ : गोंक या शिलाहार राजाच्या ताब्यात मिरिच (मिरज) व करहाटक (कराड) व दक्षिण कोकण हा प्रांत होता.यातच सांगलीचा भूभाग समाविष्ट होता.

१२०५ : शिलाहार राजा गंगादित्य याने मिरज भागांत इसकुडी येथे तलाव बांधला. कोल्हापूर, मिरज, शेडबाळ व तेरदाळ येथे याबाबतचे शिलालेख आहेत.

१२५० - देवगिरीच्या यादव राजानी या भागावर राज्य केले.

१३१८ : त्यावेळी मिरिच प्रांतात तीन हजार गांवे होती.

१३१९ - दिल्लीच्या खिलजी व तुघलकानी या भागावर राज्य केले.

१३४७ :

१३४८ - बहामनी सुलतानानी या भागावर राज्य केले.

१४८९ : विजापूरच्या अदिलशहाने या भागावर राज्य केले

१४९० -या काळात मिरज प्रांत रायबाग महालात होता

१६५८:.

१६५९ :छत्रपती शिवाजी महाराजांचा सेनापती नेताजी पालकर याने हा भाग जिंकून घेतला.

- परत अदिलशहाने हा भाग जिंकून घेतला.

१६७२ : पन्हाळयापासून मिरजे पर्यंतचा सर्व भाग शिवाजी महाराजांनी जिंकला.

- या नंतर मुसलमान सरदार विजापुरास निघून गेले.
- तेव्हापासून या भागाची सरदारकी मिरजेचे सरदार कदम यांच्याकडे होती.

१७३० : बाजीराव बल्लाळ पेशवे यांनी मिरजेचे सरदार इंद्रोजी कदम यांच्या पागेची

फडणीशी गोविंद हरी पटवर्धन यांना दिली.

१७३६: सरदार इंद्रोजी कदम हे दिल्लीवरील मोहिमेत कामास आले.

- ते निपुत्रिक होते. पुणे मुक्कामी त्याची मोठी पागा होती.
- आजही या पागेला ‘हुजूर पागा ’ असे नांव आहे.

१७४१ :सरदार इंद्रोजी कदम यांच्या पागेची सरदारकी गोविंद हरी पटवर्धन यांना देण्यात आली.

१७६१: माधवराव पेशवे यांनी गोविंद हरी पटवर्धन यांना फौजेच्या खर्चा करिता मिरजेचा किल्ला व आसपासची काही ठाणी दिली.

१७६४ :गोविंद हरी पटवर्धन व त्यांचे पुतणे परशुराम रामचंद्र व निळकंठ त्रिंबक यांचे नावे आठ हजार स्वार ठेवण्या करिता २ लक्ष मुलुखाचा बहडा करुन दिला.

१७६८: गोविंद हरी यांनी आपल्या वडिलांच्या स्मारकाकरिता सांगलीची सहाशे बिघे जमीन स्वतंत्र काढून हरीपूर हे गांव वसविले

- ते गांव शंभर ब्राह्मणांना अग्न्हार दिले.
- श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनी हे गांव बसविण्यास मंजुरी दिली.
- यानंतर हरीपूर हे क्षेत्र झाले.
- या टुमकदार गावाची त्यावेळची लोकसंख्या दोन हजार होती व सांगलीची लोकसंख्या मात्र एक हजार होती.
- यावेळी हरीपूर हे सांगलीपेक्षा मोठे होते.

१७७१ :मिरज मुक्कामी गोविंद हरी पुत्रशोकाने निधन पावले.

१७७३ :वामनराव गोविंद पटवर्धन यांच्या नांवे मिरज प्रांताचा बेहडा झाला.

१७७६ :वामनराव गोविंद पटवर्धन खानदेशात स्वारीवर असताना वरणगांव मुक्कामी

निधन पावले.

- त्यांना पुत्र संतान नव्हते. म्हणून पांडुरंग गोविंद पटवर्धन यांना जहागिंरीचा आधिकार मिळाला.

१७७७ :हैदरवर स्वारी करण्यास गेले असता पांडुरंग गोविंद पराभव पावले.

- हैदरने त्यांना अटक केली.अटकेतच ते नवज्वर होऊन निधन पावले.

१७७९ :हरिहर पांडुरंग पटवर्धन यांना सरदारकीची वस्त्रे मिळाली.

१७८२:हरिहर पांडुरंग यांचा ज्वराने मृत्यू झाला.ते निपुत्रिंक होते.

१७८३ :हरिहर पांडुरंग यांचे बंधु चिंतामणराव आप्पासाहेब यांना मिरजेच्या सरदारकीची वस्त्रे मिळाली तेव्हा त्याचे वय आठ वर्षाचे होते.

- म्हणून त्याचे चुलते गंगाधरपंत काम पहात होते.

१७८६ :नाना फडणीस मिरजेस आले होते.

१७९५ :निजाम व पेशवे यांच्या खडर्याच्या लढाईत पटवर्धन यांनी शौर्य गाजविले म्हणून चिंतामणराव आप्पासाहेब यांचे नावे २५ हजार ५२१ रुपयांचा नवा सरंजाम बेहडा पेशव्यांनी करुन दिला.

१७९९ :दुसरे बाजीराव पेशवे यांनी मिरज जहागिंरीच्या वाटण्या करण्यास परवानगी दिली.

१८०१ :सांगली हे राजधानीचे गांव झाले.म्हणजेच श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीस आले.

- गणेशदुर्गाच्या बांधकामास प्रारंभ केला.

१८०६ :सांगलीच्या श्रीगणपती मंदिराची आखणी झाली.

१८०७ :सांगलीच्या पेठांची आखणी व वसाहतीला प्रारंभ झाला.

१८०८ :पटवर्धनांतील वाटण्या पूर्ण झाल्या व सांगली हे जहागिंरीचे गांव निश्चित झाले.

१८११ :गणेशदुर्गाचे काम पूर्ण झाले.

१८१८ :इंग्रजांनी पेशव्यांचे राज्य घेतले व सर्व सरदारांना व जहागीरदारांना नोकरी करण्याचा हुकूम केला.

१८२० :'मी इंग्रजांची नोकरी करणार नाही' असे सांगून पहिले चिंतामणराव पटवर्धन यांनी १लक्ष ३८ हजार ९९५ रुपयांचा मुलूख इंग्रजांस तोडून दिला.

- त्यात हुबळी, तडस, बरडोल, बामनगट्टे हे परगणे व गोपन गोपची सरदेशमुखी व शहापूर तालुका असा मुलुख दिला.
- हा करार ईस्ट इंडिया कंपनीशी बेळगांव येथे झाला.

१८२१ :सांगली शिळा प्रेस छापखान्याची स्थापना झाली.

१८३४ :सांगलीत टांकसाळ सुरु करुन नाणी पाडण्यात येऊ लागली.

१८३८ :धुंडीराव चिंतामणराव पटवर्धन यांचा जन्म.झाला.

१८४२ :दिवाणी व फौजदारी अधिकार असलेल्या न्याधिशांची सांगलीत नेमणूक झाली.पण यावेळी कायदेकानून अस्तित्वात नव्हते.

- जुन्या वहिवाटीवरुन न्यायदान होत असे.

१८४३ :विष्णुदास भावे यांनी सांगलीत मराठी रंगभूमीस प्रारंभ केला.

१८४४ :चैत्र शुध्द दशमीला सांगलीच्या श्रीगणपतीची प्रतिष्ठापना केली.

१८४६- मिरज मळा, गणपती मळा, तात्यासाहेब मळा, उपळावी व खरशिंग येथे

१ ८५० : आंब्याच्या बागा लावल्या.

- सांगलीत आमराई तयार केली.
- हरीपूर हे गांव बुधगांवकर पटवर्धनांकडे गेले.

१८५१ :मुन्सफ न्यायालयाची प्रथम स्थापन झाली.

- याच साली पहिले चिंतामणराव आप्पासाहेब हे सांगली मुक्कामी निधन पावले.

१८५३ :कृष्णा नदीस महापूर आला.

१८५५ :सांगलीत पहिला सरकारी दवाखाना निघाला.

१८६० :मोठा दुष्काळ पडला.

१८६१ :सांगलीत सार्वजनिक शिक्षणास प्रारंभ झाला.

१८६३ :मराठी शाळा व वाचनालयाची सुरुवात झाली.

१८६४ :सांगली शहर सफाईकचेरी स्थापन.झाली.

१८६५ :सांगलीत पहिली इंग्रजी शाळा व व्याकरण शाळा निघाली.

१८६५ :वेदशास्त्र शाळेची स्थापना केली.

- या वेदशास्त्र विद्यालयात 1) ऋग्वेद 2) यजुर्वेद 3) न्याय 4) व्याकरण ५) ज्योतिष हे शिक्षण देणा-या पाठशाळा काढण्यात आल्या.

१८६८ :सांगली नगर वाचनालयाची स्थापना.झाली

१८७२ :सांगली शहराचा पहिला सिटी सर्व्हे झाला.

- याच साली अपील कोर्ट नेमण्यात आले.

१८७६ :अडमिनिस्ट्रेटर मेजर वेस्ट यांनी सांगली म्युनिसिपालिटी स्थापन केल्याचे जाहिर केले.

- याच सालात ट्रेझरी ऑफिसर नेमण्यात आला.
- यापूर्वी पथक फडणीस संस्थानचा हिशोब पहात होता.

१८७७: मोठा दुष्काळ पडला.

१८७८ :दुष्काळामुळे शाळा ओस पडल्या.

१८८४ :गणेशदुर्गमध्ये दगडी कमान बांधली.

१८८७ : पुणे मिरज रेल्वे फाटा आला.

- याच साली काकडवाडीहून 'सायफन' पध्दतीने सांगली शहरास स्वच्छ पाणी पुरवठा सुरु झाला.

१८८९ :सांगली म्युनिसिपालिटीने आगीचा पहिला बंब खरेदी केला.

१८९१ :सांगली शहराची लोकसंख्या तेरा हजार झाली.

- याच साली मिरज  कोल्हापूर रेल्वे लाईन सुरु झाली
- याच साली पोस्ट ऑफिस सुरु झाले.

१८९२ :हायस्कूलला ड्राईंग क्लास जोडला.

१८९३:सांगली स्टेट बँक सुरु झाली.

१८९५ :हायस्कूलला स्कूल फायनल क्लास जोडला.

१८९८ :सांगलीत पहिली प्लेगची साथ आली. २ हजार १५९ माणसे मयत झाली.

१९०१ :श्रीमंत धुंडिराव तात्यासाहेब निधन पावले.

- याच साली सांगलीचे अँडमिनिस्ट्रेटर म्हणून प्रथमच ब्रिटीश अधिकारी सोडून अच्युत भास्कर देसाई यांना नेमण्यात आले.कारण दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब अज्ञान होते.

१९०२ :सांगलीत वेदशाळेस ज्योतिष शास्त्राची जोड देण्यात आली.

१९०३ :पोलिटिकल एजंट यांनी दरबार भरवून सांगली संस्थानचे मालक श्रीमंत दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब झाले असल्याचे जाहीर केले.

१९०४ : अडमिनिस्ट्रेटर देसाई यांनी संस्थानात लोकल बोर्ड व स्कूल बोर्ड निर्माण केले व पागा  खर्च कमी केला.

- याच साली सांगली पांजरपोळ संस्थेची स्थापना झाली.
- कै.विष्णू रामचंद्र राजवाडे यांनी सांगलीत खाजगी मालकीचा पहिला चिंतामणी छापखाना सुरु केला.

१९०५ :प्लेगची दुसरी साथ आली.

- याच साली अँडमिनिस्ट्रेटर म्हणून कॅप्टन बर्क यांची नेमणूक झाली.
- याचसाली म्युनिसिपालिटीने स्टीम रोड रोलर खरेदी केला.
- हळद वायदे बाजार प्रारंभ.

१९०७:मिरज  सांगली रेल्वे फाटा सुरु झाला.

१९०८ :श्री गजानन मिल्सची स्थापना झाली.

१९१० :दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब यांच्याकडे कॅप्टन बर्कयांनी संस्थानचा कारभार सोपविला व ते इंग्लंडला निघून गेले.

१९०५- अँडमिनिस्ट्रेटर कॅप्टन बर्क यांच्या कारकिर्दीत खालील महत्वाची कामे झाली

१९१० :रयत सभा स्थापन केली.

- शहरात व संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.
- १९०८ साली वखारभाग स्थापून व्यापारास उत्तेजन दिले.
- कृष्णा नदीचे पाणी पंपाने नळात घेऊन टाकीत साठवून त्याचा नळाने घरोघरी पुरवठा केला.
- संस्थानात व शहरात शाळा व कचे-यांच्या सुंदर इमारती बांधल्या.
- सांगली शहराचे सौंदर्य वाढविले.

१९११:पेवाचे संडास बंद होऊन भंगी संडास सुरु झाले.

१९१३:वॉटर वर्क्सची स्थापना.

- याच साली प्लेगची चौथी साथ आली.

१९१४ :४ ते६ ऑगस्ट कृष्णा नदीस महापूर आला.शहरात तीन दिवस पाणी होते .

- ४ डिसेंबर रोजी पहिली खाजगी माध्यमिक शाळा सुरु.(सिटी हायस्कूल)

१९१६ :५ ऑक्टोबरला सांगली बँकेची स्थापना.

१९१७ :मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन कॉलेजची स्थापना व उच्च शिक्षणास प्रारंभ.

१९२० :२० फेब्रुवारीस सांगलीत ज्यातिष संमेलन लोकमान्य टिळक यांची भेट,

- याच साली लाकूड वखार भाग (टिंबर एरिया) व शिवाजी नगर वसाहतीस सुरवात.
- १२ नोव्हेंबरला महात्मा गांधींची सांगलीस भेट.
- व्यापारी मोफत वाचनालय कोनशिला गांधींनी बसविली.

१९२१ :सांगलीत जैन महिला आश्रमाची स्थापना.करण्यात आली

१९२२ : दक्षिंण संस्थांनी प्रजा परिषद चळवळ.सुरू झाली

- सांगली संस्थानात प्रजापरिषद पहिले अधिवेशन भरले अध्यक्ष मंगसुळी होते.
- महात्मा गांधी यांचे सांगलीस आगमन.

१९२५ :मुंबई इलाक्याचे गव्हर्नर ना.सर फ्लेड्रिक राइस यांची सांगली शहरास भेट

- नगरपालिकेतर्फे त्यांना मानपत्र समर्पण.

१९२७ :कॉल-याची मोठी साथ आली

१९२८ :सांगली नगरपालिकेच्या आयुर्वेदिक दवाखान्यास प्रारंभ झाला.

१९२९ :प्लेगची साथ आली.

- १८ नोव्हेंबर कृष्णा नदीवरील आयर्विन पुलाचे उद्घाटन व्हाईसराय लॉर्ड

आयर्विन.यांच्या हस्ते  झाले.

१९३०:१७ मे राऊंड टेबल कॉन्फरन्सला चिंतामणराव पटवर्धन यांचे प्रयाण.

- सांगली मेडिकल असोसिएशनची स्थापना झाली.

१९३१ :बटलर कमिशन सांगलीत आले.

१९३२ : प्लेगची साथ आली.

१९३३: सांगली महिला परिषदेची स्थापना,

- महिला शिक्षण मंडळामार्फत मुलींच्या स्वतंत्र हायस्कूलची सुरवात झाली.
- कराचीचे कार्पोरेशनचे मेअर जमशेटजी नवरोसजी मेहता यांची नगरपालिकेस भेट
- भाई परमानंद व डॉ मुंजे यांची सांगलीस भेट.
- डॉ.आंबेडकर यांची सांगलीस भेट.

१९३४ :कै.रामनारायण शेठ लड्डा यांनी सांगलीत बालाजी मिल सुरु केली.

१९३५ :सांगलीत बाल क्रीडा उद्यानाची सुरुवात.

- 10 मे सांगलीत ज्युबिली इलेक्ट्रिकल वर्क्सच्या कामाला प्रारंभ.

१९३७ :सांगलीस प्रेस अॅक्ट लागू झाला

- याचवेळी 'दक्षिण महाराष्ट्र' व 'विजय 'ही साप्ताहिके निघू लागली.
- याचवेळी शहरात वीज सुरु झाली.

१९३८:दक्षिण संस्थान प्रजापरिषद सांगलीत भरली.

- या परिषदेस वल्लभभाईपटेल, कमलादेवी चट्टोपाध्याय; पट्टाभी सितारामय्या हजर होते.

१९३९:लोकनियुक्त अध्यक्ष असण्यासंबंधीची सांगली नगरपालिकेची घटना मंजूर

झाली.

१९४० :पंडित जवाहरलाल नेहरु यांची सांगलीस खाजगी कामास्तव भेट.

१९४१ :३० सप्टेंबर सांगली बँकेचा रौप्य महोत्सव झाला.

- २ नोव्हेंबर डॉ.आंबेडकर दुस-यांदा सांगलीत आले.
- त्यांचा सांगली बार तर्फे सत्कार झाला.

१९४२ :राधाकृष्ण यांची सांगलीस भेट.

- च्या चळवळीतील श्रीमती अरुणा असफअली, श्री.अच्युतराव पटवर्धन यांच्यासारखे क्रांतीकारक सांगलीत आश्रयासाठी होते.
- १४ ऑगस्ट १९४२ सांगलीच्या जुन्या स्टेशन चौकात क्रांतीकारकांविरुध्द गोळीबार.झाला.

१९४३ : २४ जुलै १९४३ श्री.वसंतरावदादा पाटील यांनी तुरुंग फोडले.

- त्याच दिवशी आण्णा पत्रावळे व बाबुराव जाधव हुतात्मा झाले.
- श्री वसंतरावदादा यांच्या खांद्यातून गोळी जाऊन ते जखमी झाले.
- मध्ये सांगलीत नाटय शताब्दी महोत्सव साजरा झाला.
- या महोत्सवानिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे सांगलीत आगमन.□
- ७ ऑगस्ट १९४३ नामदार श्रीनिवास शास्त्री यांचे सांगलीत आगमन.

१९४४ :११ ऑगस्ट रॅंगलर र.पु.परांजपे यांची हायकमिशनर म्हणून सांगलीस भेट.

- २६ सप्टेंबर १९४४ रोजी पुण्याचे माजी मेजर बाबूरावजी जगताप यांची सांगलीस भेट.
- ऑगस्टमध्ये विजयसिंह मॉन्टेसरी शाळेची स्थापना.

१९४६ : 2 जून १९४६ सांगलीस स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट

- २२ डिसेंबर १९४६ डॉ सी.व्ही.रामन यांची सांगलीस भेट.

१९४७ : सांगली शहराचा पहिला मास्टर प्लॅननुसार झाला.महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या धोंडुमामा साठ यांनी सांगलीस न्यू इंजिनिअरिंग कॉलेज स्थापन केले .

( त्याचेच पुढे १९५५ मध्ये वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज असे नामकरण करण्यात आले.)

- १५ ऑगस्ट १९४७ सांगलीत स्वातंत्र्योस्तव साजरा.

१९४८: ७ मार्च १९४८ श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब राजेसाहेब सांगली यांनी रूपये ३५ लाखाचा ट्रस्ट करुन तो सांगली नगरपालिकेच्या स्वाधीन केला.

- १ फेब्रुवारी महात्मा गांधी वधोन्तर सांगलीत प्रचंड जाळपोळ झाली.
- ८ मार्चला सांगली संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले.
- अँडमिनिस्ट्रेटर श्री देसाई हे आले.
- सांगली ही दक्षिण सातारा जिल्ह्याची राजधानी झाली.

१९५०: १५ जानेवारीस बॅ.मुकुंदराव जयकर यांनी सांगलीस भेट दिली.

- ३०ऑगस्टला सांगलीस मार्केट अँक्ट लागू झाला.
- मिलिटरी बॉईज होस्टेलची सांगलीत स्थापना झाली.
- प्लेगची साथ.आली.

१९५१ :महात्मा गांधीच्या पुतळयाचे मुंबईचे मेजर स.का.पाटील यांच्या हस्ते अनावरण.

१९५२ :सांगली नगरपरिषदेत श्री.बाळासाहेब चव्हाण यांची चिठ्ठ्या टाकून नगराध्यक्षपदी निवड झाली.

- रिमांड होमची स्थापना झाली.

- भारताचे सरसेनापती जनरल के.एम.करिआप्पा यांनी सांगलीस भेट दिली.

१९५४ : ९ जानेवारीस भारताचे उपराष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांनी सांगलीस भेट दिली.

१९५५ :२५ मे ला अ.भा.कॉंग्रेस अध्यक्ष ढेबरभाइ यांच्या हस्ते कॉंग्रेस भवनची कोनशीला बसविण्यात आली.

१९५६ :सांगलीच्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याची स्थापना करण्यात आली.

१९५७:शंकरराव देव यांचे सांगलीत आगमन.

१९५८: सांगली महिला परिषदेचा रजत महोत्सव,

- राज्यपाल श्रीप्रकाश अध्यक्ष होते.

१९५९: १४ मे ला विनोबा भावे यांची सांगलीत पदयात्रा.

- १३ऑक्टोबरला श्रीमती इंदिरा गांधी यांचा अखिल भारतीय कॉंग्रेस अध्यक्षा म्हणून सांगलीत आगमन

१९६० :हि.हा.चिंतामणराव पटवर्धन कॉलेज ऑफ कॉमर्सची स्थापना.

१९६१ :कृष्णा नदीस मोठा महापूर आला.

- सांगली नगरपालिकेची नवीन इमारत वापरात आली.

१९६२ : भारताचे पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सांगलीस भेटदिली.

- जिल्हा परिषदेची स्थापना.यापूर्वी जिल्हा लोकल बोर्ड होते.
- ३१जुलै ला मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते अश्वारुढ शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे उद्घाटन.

१९६३ :सांगली आकाशवाणी केंद्राची स्थापना.

- नवीन सिव्हिल हॉस्पिटलच्या इमारतीचे मुख्यमंत्री श्री कन्नमवार यांच्या हस्ते उद्घाटन.

१९६४ :१ जूनला नगरपालिका प्राथ.शिक्षण मंडळाची स्थापना झाली.

१९६५ :सांगलीत सहकारी चित्रपटाची स्थापना झाली.

- 23 फेब्रुवारीस राजेसाहेब चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे निधन झाले.

१९६६ :२३ ऑक्टोबरला सांगली बँकेचा सुवर्ण महोत्सव झाला.

१९६७ :२६ जानेवारीस श्री वसंतदादा पाटील यांना पद्मभूषण किताबाने गौरविले गेले

- शासकीय अपंग बालक संस्था स्थापना झाली.
- ११ डिसेंबरला सांगलीत भूकंपाचा मोठा धक्का.

१९६९ :सांगली (जिल्हा) नगरवाचनालयाचा शतसांवत्सरिक महोत्सव पार पडले.

- विलिंग्डन महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव पार पडला.

१९७०:जिल्हा परिषद सांगलीची नवीन अद्ययावत इमारत बांधली.

१९७१: १२ एप्रिल १९७१मिरज सांगली रेल्वे लाईन बंद झाली.

- १५ एप्रिल १९७१ सांगली ब्रॉडगेज स्टेशन झाले.

१९७२-

१९७३: दुष्काळ.

१९७४ :१३ मार्च १९४७ महाराष्ट्राचे राज्यपाल अलियावर जग यांची सांगलीस भेट.
नगरपरलिकेस भेट दिली.

- १० ऑक्टोबर १९७४बिहारचे राज्यपाल आर.डी.भंडारे यांची सांगली नगरपालिकेस भेट.
- १७ डिसेंबर १९७४ नगरपालिका नवीन कायद्याप्रमाणे नगराध्यक्षांचा थेटनिवडणूक या पध्दतीने डॉ.देवीकुमार देसाई यांचा प्रथम नगराध्यक्ष

म्हणून निवड.

१९७६ :फेब्रुवारी मार्च सांगलीत मोठी टायफाईडची साथ.

- २ सप्टेंबर १९७६ सांगलीचे प्रसिध्द लेखक वि.स.खांडेकर निधन पावले.
- 13 नोव्हेंबर पद्मभूषण वसंतदादा याचा शष्ट्यब्दीपूर्त समारंभ.
- ६ डिसेंबर क्रांतिकारक नाना पाटील यांचे निधन.

१९७७ : १७एप्रिल १९७७ वसंतरावदादा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले.

- सहावी लोकसभा खासदार अण्णासाहेब गोटखिंडे (कॉंग्रेस) झाले.

१९८१ :आमराईबाग शासनाने नगरपालिकेकडे सोपविली. (२ऑक्टोंबर १९८१)

१९८७ :सांगलीत जिल्हयातील पहिला बझार सुरू ( तरूण भारत बझार )

१९८९ :वसंतदादा पाटील यांचे निधन (१मार्च १९८९)

१९९१ :नटवर्य मामा पेंडसे यांचे निधन (१२जानेवारी १९९१)

१९९६ :पै.हरी नाना पवार यांचे निधन (१६ मार्च १९९६)

१९९८ :सांगली नगरपालिका विसर्जित.महानगरपालिका स्थापन (९ फेब्रुवारी १९९८)

२००० :मंगेशकर महोत्सवाच पार पडला.

२००४ :सांगली प्रशासनाच्या जलसंधारणाच्या कामांची डॉक्यूमेंट्री जलजा चे प्रकाशन झाले.

२००५ :सांगलीत कृष्णा नदीला महापूर आला.

२००७ :अखिल भारतीय मराठी बालसंमेलन पार पडले.

२००८ :८१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. (अध्यक्ष म.द.हातकणंगलेकर)

२००९ :मिरज सांगलीत जातीय दंगल उसळली.

२०१२ :९२ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन पार पडले.(अध्यक्ष ...)

२०१४ : १८ शाळेतील ७३३८ विद्यार्थ्यांनी लेझीम प्रात्यक्षिकांत गिंनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डकेले.(२६ जानेवारी २०१४)

२०१५ : मानदेशातील दुष्काळी भागातील लुप्त पावलेल्या अग्रणी नदीचे पुनर्जीवन केले.

- शेतक-यांसाठी ईफार्मर ॲप विकसीत केला.
- इस्लामपूर शहर देशातील पहिली 4 जी वायफाय सेवा असणारे शहर / नगरपालिका झाले,
- सांगलीत माईघाट विकासास प्रारंभ झाला.
- माईघावर बोटींगला सुरवात झाली.
- आष्टा येथील आण्णासाहेब डांगे इंजिनिअरींग महाविद्यालयात देशातील पहीले मोटार ड्रायव्हींग प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले.
- जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राची सुरवात झाली.

२०१६ : माईघाट येथे पहिला सांगली कला महोत्सव २०१६ संपन्न झाला. (दि.२६,२७,२८ फेब्रुवारी २०१६)

- ११ एप्रिल २०१६ मिरजेहून जलदूतरेल्वेने लातूर शहरास पाणी पुरवठा सुरू झाला.
- ०४ मे २०१६ विहीर पुनर्जीवन कार्यक्रम शुभारंभ झाला.